Cambridge International AS Level

**Cambridge International Examinations**
Cambridge International Advanced Subsidiary Level

**MARATHI LANGUAGE** **8688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2016**

**1 hour 45 minutes**

INSERT

*1568142008-I*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

This Insert contains the reading passages for use with the Question Paper.

You may annotate this Insert and use the blank spaces for planning.
This Insert is **not** assessed by the Examiner.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

या पुस्तिकेतील उतारे वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

या पुस्तिकेचा उपयोग टीपा लिहीण्यासाठी किंवा उत्तराच्या पूर्वतयारीसाठी होऊ शकतो.
ही पुस्तिका परीक्षक तपासणार नाहीत.



DC (NF) 136785
© UCLES 2016

CAMBRIDGE
International Examinations

[Turn over

## विभाग 1

**पहिल्या** विभागातील **उतारा** वाचा आणि **प्रश्नक्रमांक 1**, **2** आणि **3** यांची उत्तरे लिहा.

**उतारा पहिला**

शिक्षण हा जीवनाचा तसेच समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. केवळ शिक्षणामुळेच व्यक्तीला समाजात आदर आणि मान मिळतो. भविष्यात कोणत्या कार्यक्षेत्रात प्रवेश घ्यायचा? निरनिराळ्या कार्यक्षेत्रात प्रवेशासाठी कोणत्या आवश्यकता असतात? हे प्रश्न नेहमीच सर्वांना भेडसावतात. आवडणाऱ्या विषयात कितीही तास आनंदाने काम करून यशस्वी होण्याची शक्यता नक्कीच जास्त असते.

दिवसेंदिवस नव-नवीन क्षेत्रांचा विकास होत असतो, अशावेळी वेग-वेगळ्या क्षेत्रांतील तज्ञांच्या मार्गदर्शनाची जबाबदारी विद्यार्थ्यांची, पालकांची तसेच शाळेचीही आहे. मात्र काही विद्यार्थी दबावाखाली येऊन आपल्याला न आवडणाऱ्या क्षेत्रात प्रवेश घेऊन नंतर पश्चाताप करतात. मुलांच्या शिक्षणात शाळेचा आणि पालकांचा सिंहाचा वाटा असतो. शालेय परीक्षेतल्या उत्तम गुणांची खबरदारी घेणारे पालक भविष्यात आवश्यक असणाऱ्या शिक्षणाचा पाया मजबूत करतात.

शालेय शिक्षण केवळ मूलभूत व्यवहार ज्ञान देते. उच्च शिक्षण वैचारिक स्वातंत्र्य देऊन, विशिष्ट क्षेत्राच्या तंत्र-ज्ञानात प्रगती करून आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवून विद्यार्थ्यांच्या आयुष्याच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करायला मदत करते. उच्च शिक्षण हे मध्यम वर्गीय माणसाच्या यशाचं, सुखाचं आणि समृद्धीच गुपितच आहे. शिक्षणामुळे जगाच्या पाठीवर कुठेही एकटे जाऊन यशस्वी होण्याचा आत्मविश्वास तरुण पिढीत आल्याचे आपण आज पाहतो.

उत्तम विद्यापीठात मेडिकल, इंजिनियरिंग, अर्थशास्त्र, कॉम्प्युटर अशा क्षेत्रात प्रवेश मिळविणे, हे अतिशय स्पर्धात्मक असते. त्यामुळे विद्यार्थी खाजगी शिकवण्या ठेवून, रात्रंदिवस कष्ट करून यशस्वी होतात. आवडत्या क्षेत्रात प्रवेश मिळविण्यासाठी मुलं परदेशातसुद्धा सहज जातात. उच्च शिक्षण हे केवळ श्रीमंतांसाठीच मर्यादित नसून महत्त्वाकांक्षा असल्यास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कर्ज सहज मिळू शकते.

शिक्षणाला इतके महत्त्व असून सुद्धा शिक्षणाची पातळी सर्वत्र सारखी नसते. बऱ्याच देशात मुला-मुलींच्या शिक्षणात भेदभाव केला जातो. गरीब किंवा अपंग मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविणे कठीण असते. अनेक गरीब विद्यार्थी रोजगारी करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असल्यामुळे प्राथमिक शिक्षणही घेऊ शकत नाहीत.

शिक्षणामुळे व्यक्तीच्या ज्ञानात, मानसिक क्षमतेत आणि आकलन शक्तीत वाढ होते. शिक्षण म्हणजे केवळ गुणांना महत्त्व तर नसून सभोवती होणाऱ्या घटनांचा तार्किक विचार करून स्वतःची प्रगती करून घेण्याची क्षमता असणे हे महत्त्वाचे आहे. इतिहासात, सुशिक्षित सुधारकांच्या नव-विचारांच्या प्रक्रियेमुळेच 'विधवांचे केश-वपन', यासारख्या घातक रूढी नाश पावल्या आहेत. देशाची प्रगती समाजाच्या साक्षरतेवरही अवलंबून असते. म्हणूनच शालेय शिक्षण प्रगत देशात मोफतच असते.

आमच्या ओळखीची अनिता घरच्या गरिबीला अतिशय कंटाळली होती. ती आणि तिचा नवरा अशिक्षितच असल्यामुळे दोघे एका शाळेत साफ-सफाईचे काम करत होते. 'आमच्या कुटुंबात सर्वांना गरिबीचा शापच आहे', असे ती सर्वांना सारखी रडत-रडत सांगत असे. परंतु आज तिचा मुलगा एक यशस्वी सर्जन झाल्यामुळे तिची सुखाची सर्व स्वप्नं साकारली आहेत आणि आता 'शापा' वरचा विश्वास दूर होऊन ती अगदी आनंदात असते.

© UCLES 2016

## विभाग 2

आता **दुसऱ्या** विभागातील **उतारा** वाचा आणि **प्रश्नक्रमांक 4** आणि **5** यांची उत्तरे लिहा.

### उतारा दुसरा

अर्थार्जन ही प्रत्येकाच्या जीवनाची आवश्यकता आहे. उच्च शिक्षण म्हणजे उत्तम नोकरी या कल्पनेमुळे दरवर्षी डॉक्टर्स, इंजिनियर्स यांसारखे हजारो व्यावसायिक आणि प्रशिक्षित तयार होतात. परंतु त्याप्रमाणात नोकऱ्या निर्माण होत नाहीत. चांगल्या कंपन्या उत्तम विद्यापीठातल्या उमेदवारांना नोकऱ्या देतात. नोकऱ्या देणाऱ्या संस्था, वृत्तपत्राच्या खास पुरवण्या आणि वेबसाईट्स वरून सारे नोकऱ्या शोधतात. अनेक जण मोठया पगाराच्या नोकरीसाठी किंवा अनुभवासाठी परदेशाची नोकरी पसंत करतात. नोकरीचे स्वरूप स्पर्धात्मक असते. कंपन्यांच्या 'ऑन-लाईन' प्रश्न-पत्रिकेमुळे अनेक उमेदवार गाळले जातात.

अनेक देशात ॲपेरेंटीसची योजना लोकप्रिय आहे. या योजनेत खास प्रशिक्षण देऊन कालांतराने त्याच नोकरीवर यशस्वी उमेदवार रुजू होतात. बँक्स, शैक्षणिक संस्था, ग्रंथालय, रुग्णालय, औषधालय, सरकारी नोकऱ्या, हिशोबनीस, व्यवस्थापन तसेच केशकर्तनालय, कलाकेंद्र, शृंगारकेंद्र, फुलांची सजावट, घर-सजावट, दर्जी, धोबी, वगैरे असंख्य छोट्या-मोठया नोकऱ्यापैकी काही उच्च-शिक्षण-प्रधान असतात तर काही केवळ खास प्रशिक्षण व अनुभवाने मिळू शकतात. गेल्या काही वर्षात कॉर्पोरेट क्षेत्राने आपले पंख विस्तारल्यामुळे प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. ॲनीमेशन, फॅशन इंडस्ट्री, एविएशन, हॉटेल इंडस्ट्री, अशी अनेक खाजगी दालने उघडली. मात्र या सर्व क्षेत्रांसाठी विशिष्ट ज्ञानाची नि कौशल्याची नितांत आवश्यकता असते. कॉल-सेंटर मध्ये रात्रपाळी करून शीला या माझ्या मैत्रिणीने आपल्या घरासाठी खूप पैसे जमविले आहेत.

आज असंख्य संधी उपलब्ध असूनही लायक उमेदवारांची त्रुटी असल्यामुळे बेकारी आहेच! केवढा प्रचंड विरोधाभास! कित्येकदा शैक्षणिक पात्रता असूनही अपयश येते कारण नोकरीच्या दृष्टीने उमेदवाराला बाकीची कौशल्येही जरुरीची असतात. अनुभव, वाक्चातुर्य, व्यवस्थापन, वेळेची मर्यादा राखणे, समुहात काम करणे, स्वतःचे उत्तम प्रतिपादन करणे वगैरे. प्रौढ व अनुभवी उमेदवार सुद्धा टेक्नोलॉजीच्या अभावी संधीला मुकतात. नोकरी मिळविण्यासाठी शिफारस-पत्रही आवश्यक असते. सर्वांना सारे जमतेच असं नाही. त्यामुळे बेकारीग्रस्तांना आयुष्यातील तणावांना सामोरी जावे लागते. अशावेळी काही काळ विनामूल्य काम करून, उमेदवार अनुभव आणि आत्मविश्वास कमावून भविष्यात नोकरी मिळविण्याची शक्यता वाढवू शकतो.

अनेक तरुण स्वतंत्र व्यवसायाचे स्वप्न बाळगतात. उद्योजकांना अनेक संस्था पाठिंबा देतात. अनेक वेळा जीवनावश्यक गोष्टीच्या त्रुटीचा फायदा घेऊन अथवा आपल्या सेवेची किंवा मालाची मागणी निर्माण करून बुद्धीच्या जोरावर कल्पकतेने, जनतेचे जीवन सुखावह करतात आणि व्यवसायात यशस्वी होतात. कुरीयर-सेवा, खाजगी सॉफ्टवेर-अप्लिकेशन्स ही उत्तम उदाहरणे आहेत. तसेच मानवाला व्यक्तिशः जाण्यास अवघड अशा प्रेक्षणीय स्थळी विश्वसनीय पर्यटक-संस्था सुखावह सहली काढून अतिशय यशस्वी ठरल्या आहेत. 'अंतरिक्षाची सहल' हे सध्याचं पर्यटन क्षेत्रातील असंच आश्चर्यकारक आकर्षण आहे.

आज समान न्यायाच्या तत्त्वानुसार सर्व तरुणांना समान संधी मिळू शकते. मात्र कष्ट करायची तयारी आणि हिंमत असल्यावर ज्ञानाच्या नि बुद्धीच्या जोरावर कोणीतीही महत्वाकांक्षी व्यक्ती हमखास यशस्वी होऊ शकेल.

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

To avoid the issue of disclosure of answer-related information to candidates, all copyright acknowledgements are reproduced online in the Cambridge International Examinations Copyright Acknowledgements Booklet. This is produced for each series of examinations and is freely available to download at www.cie.org.uk after the live examination series.

Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.